**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या ८ मतदारसंघात उद्या मतदान

- चौथ्या टप्प्यातल्या मतदारसंघात अर्ज भरण्याची मुदत संपली, पाचव्या टप्प्यासाठी उद्यापासून अर्ज भरण्याची मुभा

- जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर ठेवणं, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासह पीकवीम्याचे निकष बदलण्याचं आणि रोजगाराच्या संधी वाढवण्याचं उद्धव ठाकरे यांचं वचननाम्यात आश्वासन

**आणि**

- जातनिहाय जनगणना, महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याची शरद पवार यांची शपथपत्रात ग्वाही

**<><><><><>**

राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात उद्या दुसऱ्या टप्प्याचं मतदान होणार असून मतदानाच्या दृष्टीनं संबंधित मतदारसंघात जय्यत तयारी प्रशासनानं केली आहे. अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, यवतमाळ-वाशिम, अमरावती, वर्धा आणि बुलडाणा या मतदारसंघामधे मिळून २०४ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत. यातले सर्वाधिक ३७ अमरावतीमध्ये असून सर्वात कमी १५ अकोल्यात आहेत. अमरावती, हिंगोली आणि परभणीत ३० पेक्षा अधिक उमेदवार रिंगणात आहेत, त्यामुळे याठिकाणी प्रत्येकी ३ बॅलेट युनिट, अकोल्यात १ आणि उर्वरित मतदारसंघात प्रत्येकी २ बॅलेट युनिट असतील.

विद्यमान खासदार प्रतापराव जाधव, नवनीत राणा, रामदास तडस, प्रतापराव पाटील-चिखलीकर, संजय जाधव यांच्यासह प्रकाश आंबेडकर, महादेव जानकर असे अनेक महत्त्वाचे उमेदवार या मतदारसंघातून निवडणूक रिंगणात आहे.

सर्व ८ मतदारसंघात एकूण १ कोटी ४९ लाख २५ हजार ९१२ मतदार आहेत. याशिवाय १८ हजारांहून अधिक जणांनी टपालाद्वारे तर १४ हजारांहून अधिक मतदारांनी घरातून मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नोंदणी केली आहे. मतदार संख्येच्या दृष्टीकोनातून विचार करता सर्वाधिक २१ लाख २३ हजार ५६ मतदार परभणीत असून सर्वात कमी १६ लाख ८२ हजार ७७१ मतदार वर्धा लोकसभा मतदारसंघात आहेत.

या टप्प्यात एकूण १६ हजार ५८९ मतदान केंद्र उभारली असून सर्वाधिक २ हजार २९० परभणीत तर सर्वात कमी १ हजार ९६२ मतदान केंद्र बुलढाण्यात आहेत.

**<><><><><>**

दुसऱ्या टप्प्यात सर्वत्र सकाळी ७ वाजेपासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान करता येईल. संध्याकाळी ६ वाजता रांगेत असलेल्या सर्व मतदारांना टोकन दिलं जाईल आणि टोकन असलेल्या सर्वांना मतदानाचा हक्क बजावता येईल.

**नांदेड** लोकसभा मतदारसंघातल्या २ हजार ६८ मतदान केंद्रांसाठी १० हजार ६०० हून अधिक कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मतदानाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघात १ हजार ३५९ मतदान केंद्रावर वेबकॉस्टिंगद्वारे मतदानावर नजर ठेवली जाणार आहे.

**अकोल्यात** ६ हजाराहून अधिक पोलिस अधिकारी, कर्मचारी तैनात आहेत.

**यवतमाळ-वाशिम** मतदारसंघात महिला कर्मचाऱ्यांद्वारे संचलित, दिव्यांग मतदारांसाठी, युवकांसाठी आणि आदर्श असे प्रत्येकी ६ मतदान केंद्र आहेत. त्यासाठीचे अधिकारी-कर्मचारी तसंच पोलिस मतदान केंद्रावर रवाना झाले आहेत.

**परभणीतल्या** १ हजार १४५ मतदान केंद्रांची वेब कास्टिंगव्दारे पाहणी होणार आहे. तपमान वाढल्यानं अनेक ठिकाणी विविध उपाययोजना केल्या आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिली आहे.

राज्यातल्या या मतदारसंघातल्या मतदानाचा आढावा घेणारा विशेष कार्यक्रम ‘मतदानाचा आढावा’ उद्या आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर सादर होणार आहे. रात्री सव्वा आठ पासून हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपली. यात **नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, पुणे, मावळ, शिरुर, अहमदनगर, शिर्डी** आणि बीड या मतदारसंघांचा समावेश आहे.

या टप्प्यात हीना गावित, स्मिता वाघ, रक्षा खडसे, रावसाहेब दानवे, संदीपान भुमरे, चंद्रकांत खैरे, इम्तियाज जलील, मुरलीधर मोहोळ, रविंद्र धंगेकर, श्रीरंग बारणे, अमोल कोल्हे, शिवाजीराव आढळराव पाटील, सुजय विखे-पाटील, निलेश लंके, सदाशिव लोखंडे, भाऊसाहेब वाकचौरे, पंकजा मुंडे यांच्यासह अनेक उमेदवारांनी या मतदारसंघातून अर्ज भरले.

या उमेदवारी अर्जांची उद्या छाननी होणार असून सोमवारपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. या टप्प्यात ९ राज्यं आणि एका केंद्रशासित

प्रदेशातल्या मिळून ९६ लोकसभा मतदारसंघांमध्ये १३ मे रोजी मतदान होणार आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी अर्ज भरायची मुदत उद्यापासून सुरू होणार आहे. या मतदारसंघात इच्छुकांना ३ मे पर्यंत अर्ज भरता येतील. यात राज्यातल्या १३ मतदारसंघांसह देशातल्या एकूण ४९ मतदारसंघांचा समावेश आहे. त्यात मुंबईतले सर्व ६ मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघांपैकी नाशिक, ठाणे, पालघर, दक्षिण मुंबई, उत्तर मध्य मुंबई आणि वायव्य मुंबईतले उमेदवार महायुतीनं अजून जाहीर केलेले नाहीत. उत्तर मुंबई आणि उत्तर मध्य मुंबईतले उमेदवार महाविकास आघाडीकडून काँग्रेसनं जाहीर केलेले नाहीत.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण सातारा लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा जाहीरनामा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईत जाहीर केला. किमान ५ जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू, शेतकऱ्यांना कर्जमुक्त करु, पीकविम्याचे निकष बदलू, ‘विकेल ते पिकेल’ या योजनेचं पुनरुज्जीवन करु, जिल्हा रुग्णालयं

अद्ययावत करु, रोजगाराच्या संधी वाढवणे इत्यादी घोषणा या जाहीरनाम्यात केल्या आहेत. देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईचं स्थान पुन्हा मिळवून देऊ, असंही ते म्हणाले. पर्यावरणाला घातक प्रकल्पांना आपला विरोध कायम राहील, असं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांच्या वस्तूंवर जीएसटी हटवणं, आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्याच्या पुढे नेण्यालाही उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दिला आहे.

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना केंद्रसरकार काहीही करत नव्हतं, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आज पुण्यात प्रसिद्ध झाला. शपथनामा नावाने प्रसिद्ध झालेल्या या जाहीरनाम्यात स्वयंपाकाचा गॅस दर पाचशे रुपयांपर्यंत करणे, नोकऱ्यांमधील वीस लाख सरकारी रिक्त जागा भरण्यावर भर दिला आहे. जातनिहाय जनगणना, कृषी कल्याण आयोगाची स्थापना, महिलांना नोकऱ्यांमधे ५० टक्के आरक्षण, शिकाऊ उमेदवार म्हणून नोकरीचा अधिकार, याबरोबरच जम्मू काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याला पूर्ण पाठिंबा या मुद्द्यांचा यात समावेश आहे. एक देश एक निवडणूक या संकल्पनेला पक्षाचा विरोध असल्याचंही या जाहीरनाम्यात स्पष्ट केलं आहे. नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय नागरिक नोंदणी, दहशतवादाविरोधातला युएपीए कायदा इत्यादी कायद्यांचा फेर आढावा घेऊन त्यात बदल करण्याचं आश्वासन शरद पवार यांच्या पक्षानं दिलं आहे.

**<><><><><>**

महायुतीमध्ये असताना प्रधानमंत्री मोदी यांची स्तुती करणारेच आज त्यांचा विरोध करत आहेत अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज औरंगाबादमध्ये केली.

**<><><><>**

देशात ८७ टक्के नागरिक नोकरी अभावी वणवण फिरत आहेत, हीच ‘मोदी की गॅरंटी’ आहे का, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज राहुरीमध्ये केला. महागाई ५० टक्क्यांनी कमी करू आणि देशातल्या नागरिकांना रोजगार देऊ, अशी आश्वासनं देणाऱ्यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये जनतेची निराशा केल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

काँग्रेसनं आज सांगलीमधे कार्यकर्ता मेळावा आयोजित केला होता. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, आदी नेत्यांनी या मेळाव्याला मार्गदर्शन केलं. सांगली जिल्ह्यातल्या कार्यकर्त्यांच्या भावना आणि दुःख समजतो, तुमच्या वेदनांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. परंतु काँग्रेसचं कुटुंब एकसंध राहिलं पाहिजे, असं पटोले यांनी यावेळी सांगितलं.

त्यानंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत काँग्रेसचे बंडखोर अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांच्यावर कारवाई होणार का, या प्रश्नावर, आजचा अहवाल वरिष्ठांना पाठवला जाईल, त्यानंतर कारवाईबाबत निर्णय घेतला जाईल, असं पटोले म्हणाले.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज संध्याकाळी साडे सात वाजता हैद्राबाद इथं सन रायझर्स हैद्राबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू या संघात सामना होईल. बेंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला.

**<><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण वगळता राज्याच्या उर्वरित भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. तसंच तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहील. कोकणात हवामान कोरडं राहील आणि तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल  असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**